झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/मा.क्र.२३५/५१२अ हरकानगर/१०९९/२०२३
दिनांक : ३०/०८/२०२३.

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

### महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत आला आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/ प्र.क्र.२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(२) पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे मौजे भवानी पेठ, सि.स.नं. ५१२/अ, हरकानगर, भवानी पेठ, पुणे येथील झोपडपट्टी क्षेत्रफळ ११७५.२५ चौ.मी. (ज्याबाबतचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत आला आहे) हे क्षेत्र पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे;

(३) सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. पुष्पागंगा डेव्हलपमेंट्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दि.१६/०७/२०१६ रोजी दाखल करणेत आलेला आहे आणि, तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झो.पु.प्रा.,पुणे यांनी सदर प्रकरणात ७०% हून जास्त झोपडीधारकांचे संमतीपत्र प्राप्त असल्याचे प्रमाणीत केले आहे.

(४) अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व त्रिमीती पध्दतीने परीगणनेनुसार तसेच प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार एकूण क्षेत्र ११७२.२५ चौ.मी. असून सदर क्षेत्राचा महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक पुरवणी, अग्रहायण १७, शके १९०५ मधील पान क्र. ३३१४ यामध्ये प्रसिद्ध दि. ०८/१२/१९८३ रोजी सादर केला आहे.

(५) सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२८/०९/२०२२ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ३ - ९, २०२२/कार्तिक १२ - १८, शके १९४४ मधील पान क्र. २१ ते २२ मध्ये तसेच दै.भारत डायरी व दै. प्रभात या वृत्तपत्रात दि. ०५/०९/२०२२ व दि. १६/०९/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्व साधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि. २०/१०/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे;

(६) झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पुर्व सूचना) दि. २८/०९/२०२२ अन्वये करणेत आली असुन दि. २०/१०/२०२२ रोजी प्रसिद्ध करणेत आले वर हरकतदार श्री. रवि संदीप अडागळे यांनी दि. २७/१०/२०२२ रोजीचे अर्जान्वये हरकत घेतली आहे. त्यानुसार, अर्जदार यांचे हरकत अर्जावर त्यांचे म्हणणे मांडणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेसमोर हरकतदार यांची सुनावणी रीतसर घेऊन

दि.३१/०१/२०२३ रोजीचे निकलपत्रातील नमूद कारणास्तव हरकतदार श्री. रवि संदीप अडागळे यांची हरकत फेटाळण्यात आली आहे. सदर निर्णयाची प्रत पोस्टाद्वारे सर्व संबधितांना देणेत आली आहे. तसेच, निम्नस्वाक्षरीकरांनी दि. २६/०४/२०२३ रोजी समक्ष योजनेची स्थळपाहणी केलेली आहे.

(७) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा.,पुणे हे सक्षम आहेत.

अनुसूचीमध्ये नमूद एकूण ११७५.२५ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे. सबब उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता प्रचलित अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश :-**

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.२८/०९/२०२२ रोजीचा पूर्वसुचना आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई यांचे कार्यालयात अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :** सि. स.नं. ५१२/अ, हरकानगर, भवानी पेठ, पुणे.

**महानगरपालिका क्षेत्र :** पुणे महानगरपालिका.

| गाव | सि.स.नं. | जमीनी भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| भवानी पेठ, पुणे | ५१२/अ | सरकार | ११७५.२५ चौ.मी. | पुर्वेस - लागू न. भु. क्र. ५१२/ब | |
| | | | | पश्चिमेस - लागू न. भु. क्र. ५१३ अ + ब | |
| | | | | दक्षिणेस - लागू न. भु. क्र. ५१४ | |
| | | | | उत्तरेस - लागू न. भु. क्र. ३८३ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- पुणे.

दिनांक :-३० / ०८/२०२३.

नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- **रजि. पोस्ट द्वारे - हरकानगर, भवानी पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याच्या संदर्भातील कलम ३ क चा अंतिम आदेश**

१. मा. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

२. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना जमीन निमशासकीय मालकीची असल्याने आपले लक्ष महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. उक्त आदेश अंतिम करण्यात आल्यानंतर या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आपल्या विभागाच्या वेगळ्या संमती अथवा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. खाजगी क्षेत्राचे बाबतीत विकसकाकडे मालकी / विकसन हक्क नसल्यास असे क्षेत्र उक्त अधिनियमामधील प्रकरण पाच मधील तरतूदींन्वये संपादित करण्यात येईल. तसेच अशा शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची [illegible]